# व्यापारी व बाजारपेठेतील वास्तव परिस्थितीचे चित्रण : कापूसकाळ

डॉ.सुरेश लक्ष्मण नजन
मराठी विभागप्रमुख
प्रवरा मेडिकल ट्रस्टचे आर्टस्
कॉमर्स & सायन्स कॉलेज, शेवगाव.
इ-मेल – sureshnajan50@gmail.com मो.नं. ९५५२९०२०६४

**प्रस्तावना :** कादंबरी हा वाङ्मयप्रकार इतर वाङ्मयप्रकारापेक्षा वेगळ्या स्वरूपाचा आहे. मानवी जीवनाचे यथार्थ दर्शन या वाङ्मयप्रकारात घडत असल्यामुळे तो एक महत्त्वपूर्ण वाङ्मयप्रकार आहे. परंपरेने चालत आलेल्या मौखिक गोष्टी लिखित स्वरुपात ज्यावेळी आल्या त्यावेळी त्या कथा म्हणून प्रसिध्द झाल्या. नंतर त्या पुढे लघुकथा, दीर्घकथा, लघुकादंबरी या स्वरुपात विकसित झाल्या. कादंबरीतील विषय मानवी जीवनाशी निगडीत असतो. कादंबरीकारांच्या माध्यमातून समाजजीवनात घडणाऱ्या घटना, निर्माण होणारी विशिष्ट परिस्थिती, राजकीय, सामाजिक बदल यांचे परिणाम प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे कादंबरी निर्मितीवर होत असतात.

मानवी जीवनातील वास्तव दर्शन साहित्याच्या माध्यमातून सूचकपणे मांडले जाते. साहित्यामध्ये कथा, कादंबरी, नाटक, कविता इत्यादी वाङ्मयप्रकाराचा समावेश होतो. साहित्याचा आवाका व्यापक असून साहित्यातील महत्वाचा प्रकार म्हणजे कादंबरी आहे. मानवी जीवनाचे समग्र दर्शन कादंबरीत घडत असते.

'कापूसकाळ' ही डॉ. कैलास दौंड यांनी लिहिलेली एक गाजलेली मराठी कादंबरी आहे, जी कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या जीवनातील संघर्ष, त्यांचे प्रश्न आणि विदर्भ-मराठवाड्याच्या मातीशी जोडलेले वास्तव मांडते; यात कापूस लागवडीपासून ते वेचणी, बाजारपेठेतील चढ-उतार आणि त्यातून निर्माण होणाऱ्या सामाजिक-आर्थिक समस्यांचे चित्रण आहे, ज्यात शेतकऱ्यांच्या व्यथा आणि माणुसकीचे दर्शन घडते.

**गृहीतके :**

- ग्रामीण भागातील वास्तव परिस्थितीचे स्वरूप समजून घेणे.
- शेतकऱ्यांच्या व्यथा, संघर्ष जाणून घेणे.
- सरकारी योजना त्याचबरोबर सरकारी फेडरेशनमधील भ्रष्टाचाराचा शोध घेणे.

'कापूसकाळ' ही कैलास दौंड यांची २००९ साली प्रकाशित झालेली कादंबरी आहे. "महाराष्ट्रातील कृषि आधारित समाजव्यवस्था, या व्यवस्थेला अस्थिर आणि कायमच खाईत लोटणारी बाजारव्यवस्था यातच भरीस भर म्हणून सरकारी धोरणे या सगळ्यांमुळे कोणे एकेकाळी थोडे बरेबुरे असलेले शेतकरी जीवन आज कमालीचे आणि हलाखीकडे झुकलेले आहे. याचा जेव्हा आपण संवेदनशीलतेने व माणुसपणातून विचार करू लागता तेव्हा या स्थितीला कारणीभूत असणारे अनेक पैलू नजरेसमोर येतात. कृषी जीवनातील अस्वस्थता आणि अगतिकता यांच्या निरीक्षणाने होणाऱ्या अवस्थेतून कापूसकाळ या कादंबरीची निर्मिती झालेली आहे"[१]. कापूस पिकवणाऱ्या शेतकरी जीवनावर ही कादंबरी आधारित आहे.ज्यांच्याकडे पाण्याची कमतरता आहे. असा शेतकरी वर्ग खरीप व रब्बी पिके घेतो. पाऊसावर मोठ्या प्रमाणात शेती अवलंबून असते. योग्य वेळेवर पाऊस पडला तर योग्य पिकाची लागण होते. या कादंबरीत जगू या नायकाच्या माध्यमातून काबाडकष्ट करून काळ्या मातीत पिकवलेला कापूस विक्रीला नेतांनी व्यापारी, फेडरेशनवाले कशी लुबाडणूक करतात. महिना-महिना नंबरला राहूनही शेतकऱ्याचा नंबर लागत नाही. त्याच फेडरेशनवर चेअरमन साहेबांच्या वशिल्याने रात्री व्यापाऱ्याच्या गाड्या खाली होतात.ही सर्व परिस्थिती पाहून शेतकरी हवालदिल होतात व आत्महत्या करण्याचा प्रयत्न करतात. यातून बाजारपेठेतील वास्तव परिस्थिती नजरेसमोर येते.

कादंबरीत जगू आणि त्याची पत्नी सुशाबाई व त्यांची दोन मुले (सुभाष, कमल) या कुटुंबाच्या माध्यमातून कादंबरीचे कथानकउलगडते. कादंबरीच्या सुरुवातीलाच कापूस मोठ्या प्रमाणात फुटल्यामुळे भूमिहिनांची मुले शिवारात रात्री फिरून कापूस चोरी करतात. मजूर वेळेवर भेटत नसल्याने चोऱ्याचे प्रमाण वाढले होते. जगू या शेतकऱ्यांचा कापूस खूप फुटलेला असतो. गावभर हिंडल्यानंतर शाळेतील दोन मुले कापूस वेचण्यासाठी जगूला भेटतात. त्यात जगूचा मुलगा सुभाष याला ताप आल्यामुळे जगूची बायकोसुशा पैशाअभावीवेचलेला कापूस पिंपरीला विकून मुलाचा दवाखाना करते. जगू रानातील वेचलेला कापूस गावातील लोकांच्या बैलगाडीमध्ये टाकून घरी आणतो. शेतातील कामाबरोबर नारायणवाडी गावात सोसायटीच्या इलेक्शनची तयारी चालू असते.गावामध्ये राजकीय दोन- तीन गट असतात. त्यातच गायकवाडच्या पार्टीच्या विरोधात वातावरण तयार करण्यासाठी बाबू कातखड्या गावभर फिरत असतो.एकीकडे घरात कापूस असल्याने कापसावरील कीडे पोरांना चावून त्यांना गांधडे येतात. त्यामुळे जगू घरातील कापूस लवकर विक्री करण्याचा निर्णय घेतो.शेतातील कामे संपल्यावर जगू ट्रॅक्टरवाल्या सुन्याकडे कामाला जातो.सुन्याहा कापसाचा व्यापारी असतो. कापसाची ट्रिप करण्यासाठी तो ट्रॅक्टर भाड्याने देतो.सुन्या, जगू, तुकारामचा कापूस घेऊन फेडरेशनला जातात.सुन्या व्यापारी असल्याने त्याला बाजारपेठेतील साऱ्या लिंक माहिती असतात. चेअरमन साहेबांना चारशे रुपये देऊन वशिल्याने सुन्या टोकन फाडतो. त्यामुळेट्रॅक्टर लगेच खाली होऊन मध्यरात्रीच गावी येतात. व्यापारी आणि चेअरमनच्या संबंधामुळे बाजारपेठेतील भ्रष्टाचाराच्या वास्तव परिस्थितीचे चित्रण होते.

गावात फक्त सुन्याच एकटाच व्यापारी नाही तर संज्याही कापसाचा धंदा सुरू करतो. तो कापूस फेडरेशनला नेतांनी त्यात पाणी,मीठ टाकत असे. हे सगळे व्यापारी खोटं-नाटं करून शेतकऱ्यांचा घेतलेला कापूस फेडरेशनला वशिल्याने विकतात आणि फेडरेशनवर पंधरा दिवसापासून शेतकरी नंबरची वाट पाहतात. तरी त्यांचा नंबर येत नाही. कापूस विकला जात नाही, काहीजण नंबर आला नाही म्हणून आत्महत्येची भाषा बोलून दाखवतात. ही सगळी परिस्थिती जगू जवळून पाहतो त्यामुळे त्याच्या मनात अनेक विचार येतात. फेडरेशनमध्ये एक घटना घडते. करोडी गावच्या माणसाला रस्त्याला एक भोत सापडते तो भोत आपल्या गाडीत टाकून फेडरेशनला घेऊन येतो. त्या सापडलेल्या भोतात फेडरेशनवर प्रेत निघते व त्याला अटक होते. चौकशी,पंचनामे सुरु होतात. दुसऱ्याच्या भोतापायी त्याचे बारा वाजतात.

जगू कामावर गेल्यावर सुशा एकटी घरी असते. ती शेळी घेऊन ओढ्याच्या कडेला उंबराचा पाला आणायला जाते. तिथे राघू असतो त्याची तिच्यावर नजर असते. तो तिच्या शरीरयष्टीकडे लैंगिक संबंधाने स्वतःची भूक भागवायला पाहतो. पण सुशा ही एक कष्टाळू,प्रामाणिक स्त्री म्हणून ती त्याच्या कोणत्याही भूलथापांना बळी पडत नाही हे स्त्रीचे वास्तवचित्रही कादंबरीत दिसून येते. जगूने फेडरेशनची सर्व परिस्थिती पाहिल्यावर संज्याच्या ट्रॅक्टरमध्ये आपला कापुस नेऊन फेडरेशनला खाली करतो. फेडरेशनवर आपल्या कापसाच्या नंबरची वाट पाहताना अनेक घटना, प्रसंग घडतात.कौसाबाई सखाराम कुलाळ नावाच्या बाईचा एक भोत वजनाच्या वेळेस चोरीला गेल्याने तिला वेड लागते. पोलीस,प्रशासन, प्रेस यांच्या गाड्या येऊन त्या बाईची चौकशी करून फोटो काढून घेऊन जातात. नंबर न लावलेल्या व्यापाऱ्याचा टॅम्पो अर्ध्यारात्री फेडरेशनमध्ये जातो. शेतकऱ्यांनी त्या ठिकाणी जमाव केल्यानंतर उद्या सकाळी तुमच्या गाड्या खाली करू असे सांगितले जाऊन नाव लिहून घेतले जाते. टेम्पो अडवलेल्या करामतीने शेतकऱ्यांचे नंबर घेण्यात येतात. त्यात जगूचा पहिला नंबर लागतो. एका ट्रॅक्टरवाल्याला शंभर रुपये देऊन कापूस काट्यावर नेल्यानंतर ग्रेडर कापूस चांगला नाही म्हणून दोन नंबरची ग्रेड देतो. त्यावर जगू चिडून ग्रेडरवर धावतो. सगळे शेतकरी मिळवून ग्रेडरला मारतात. या सगळ्या गोष्टी पाहिल्यानंतर शेतकऱ्याचा जमाव पाहून जगूच्या कापसाला खरेदी-विक्री संघाचे चेअरमन एक नंबरचा ग्रेड देतात. जगू कापूस फेडरेशनला देऊन आल्यानंतर बहिणीच्या नवऱ्याची गुढी फेडरेशनवर कलागत झाल्याचे कळते.जगू तसाच गुढी फेडरेशनवर गेल्यावर समजते की व्यापाऱ्याचा माल घेतात व शेतकरी महिना-महिना नंबरला आहे म्हणून बहिणीचा नवरा तुकाराम माने व्यापाऱ्याच्या विरोधात गेला म्हणून कलागत झाली. "आय खाऊ देयना आणि बाप भिकमागू देयना"(पृ.११२) अशी कापसाची परिस्थिती झालेली दिसते.व्यापाऱ्याला विकावा तर कवडीमोलाचा भाव, सरकारला विकावा तर पैशाचे तीन टप्पे, महिना-महिना माप नाही. अशी सर्व परिस्थिती कापूस पिकवणाऱ्या शेतकऱ्याची झाली आहे.

जगूची बहिण रख्माचा नवरा कापूस विकण्यासाठी बैलगाडी घेऊन फेडरेशनला गेल्यावर चाऱ्याअभावी त्यांचा बैल हात-पाय खोडून मरतो. सरकार शेतकऱ्याला मदत म्हणून दहा-बारा हजार रुपयांच्या बैलाचे तीन हजार रुपये

देतात.शेतकऱ्यांवर कोसळलेल्या संकटाला सरकार छोटीशी तुटपुंजी मदत करते हे भयानक वास्तव या कादंबरीत दिसून येते.जगू सुन्यासोबत ट्रॅक्टरवर फेडरेशनला जातो.फेडरेशनमधील कापसाला आग लागते.ग्रेडरने काहीतरी काळ बेरं (गफला) केला असेल, कापसाचा हिशोब जुळत नसेल अशी चर्चा शेतकऱ्यांमध्ये चाललेली होती. कापूस जळाल्याने फेडरेशन बंद होते.सरकारी फेडरेशनमध्येझालेलाभ्रष्टाचारउघड होऊ नये म्हणून सरकारी कर्मचारी फेडरेशनमधील कापसाला आग लावून पेटवून देण्याचा प्रकार शेतकऱ्यांच्या संवादातून उघडकीस येतो.

दुसऱ्या दिवशी एक चांगले अधिकारी म्हणून नावलौकिक असलेले जिल्हाधिकारी देवरावसाहेब येऊन ती परिस्थिती पाहतात व शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून शेतकऱ्यांच्या गाड्या वाघापूरच्या फेडरेशनला खाली करायचे आदेश सोडतात. त्यामुळे जीव मुठीत धरलेले शेतकरी मोकळा श्वास घेऊन वाघापूरला निघतात.सुन्या आणि जगू वाघापूरला गेल्यानंतर बाजार समितीचा चेअरमन वांढेकर भाऊच्या वशिल्याने ट्रॅक्टर खाली करून संध्याकाळी गावी जातात. दुसऱ्या दिवशी सोसायटीचे मतदान असते. जगू दोन्ही पार्टीकडून आपला नंबर घेऊन मतदान करतो. दिवसभर रानात जाऊन शेळी चारून सायंकाळी मतमोजणीला येतो. जगूचा भाऊ भगवान हा दुसऱ्या पार्टीकडून कर्जदार गटातून निवडून येतो. व बाकीचे दुसऱ्या पॅनलचे उमेदवार निवडून येतात. एकीकडे गावात जल्लोष चालू असताना रघुकडून रख्माबाईचा बैल विहिरीत पडून त्याच्या पाठीचा कणा मोडतो. अशा सर्व घटना गावगाड्यात घडताना दिसतात. एकंदरीत कादंबरीत शेतकरी संघर्षाबरोबर गावगाड्यातील राजकीय डावपेच दिसून येतात.

जगूची आई साडेतीन महिन्यापासून पैठण-पंढरपूर करत होती ती घरी येते. जमिनीची मशागत करायची असल्याने जगू वावरातले चार फास घरी आणून सुन्याकडून जमीन नांगरून घेतो. जगूचा भाचा मधू कृषीचे शिक्षण घेतल्याने पीक-पाण्याचा सल्ला शेतकऱ्यांना देतो. जगू सगळ्या बाजाराचा अंदाज घेऊन 'बन्नी' या बियाण्याच्या तीन पिशव्या घेतो व तीनएक्कर शेत ११०० रुपयाला मेहनत करायला तुकारामला देतो. या सगळ्या गोष्टीने जगू सुखावतो. गाढ झोपल्यानंतर स्वप्नांत कपाशी चांगली आल्याचे दिसते व मागच्या वर्षीची संपूर्ण कापूस कहाणी आठवल्यानंतर तो मोठ्याने ओरडतो.

"फुलून आला सारा माळ
कापूस नाही कापूसकाळ"

या कादंबरीतील कथानकाच्या छोट्या छोट्या प्रसंगाच्या माध्यमातून व्यापारी व बाजारपेठेतील वास्तव परिस्थिती मांडलेली आहे. "कापूसकाळ ही कैलास दौंड यांची कादंबरी कापूस पिकवणाऱ्या शेतकऱ्यांची परवड प्रभावी शब्दात मांडते. यातून सामोरी येते ती शोषण करणाऱ्या समाजाची बेमुर्वत खोरवृती. या कादंबरीत ग्रामजीवनातील एकमेकांना मदत करण्याची कौटुंबिक वृत्तीही दुग्गोचर होते"[२].

या कादंबरीच्या माध्यमातून रात्रंदिवस काबाडकष्ट करून शेतात राब-राब राबवून काळ्या मातीतून हाताशी आलेल्या घासाचे कसे कवडीमोल पैसे येतात. त्यासाठी एक-एक महिना फेडरेशनला बसावे लागते."कापूसकाळ ही पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा अशा सीमाप्रदेशातील एका कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे वास्तव्य असणाऱ्या नारायणवाडी या काल्पनिक खेड्यातील कथा आहे. आपल्याकडे शेती हा मोसमी पाऊसाच्या बेभरवशीपणामुळे जुगार समजला जाणारा व्यवसाय आहे. पण या कादंबरीत पीक चांगले आले आहे. नैसर्गिक दुष्काळावर पूर्वी खूप रंजित आणि अतिरंजित लिहिले गेले आहे. त्यामुळे असा दुष्काळ दाखवणे हा कापूसकाळाचा उद्देश नाही तर निसर्गाने साथ देऊनही आलेल्या चांगल्या पिकांचे काय होते हा जो छळणारा प्रश्न आहे तो २००४-०५ मध्ये जाळणाराही प्रश्न होता"[३]. कापूस पिकवण्यापासून ते कापूस विकण्यापर्यंतचा संघर्ष या कादंबरीत मांडलेला आहे.

कापूसकाळ कादंबरीतील कथानक एका शेतकरी कुटुंबाच्या माध्यमातून समाजातील वास्तव परिस्थितीचे चित्रण करते. 'कापूसकाळ' ही शेतकऱ्यांच्या जीवनावर आधारित एक वास्तववादी आणि हृदयस्पर्शी कादंबरी आहे, जी शेती आणि ग्रामीण महाराष्ट्रातील जीवनाचे सखोल चित्रण करते.

**निष्कर्ष :**

- □. जागतिकीकरणाचा परिणाम २००० नंतरच्या ग्रामीण कादंबरीमध्ये झालेला पहावयास मिळतो.
- □. स्वातंत्र्योत्तर ग्रामीण कादंबरी वास्तववादाला अधिक स्पर्श करतेग्रामीणभागाच्याविकासासाठीसरकारनेविविधयोजनाकेल्यापरंतुयायोजनागरीब,

सर्वसामान्यशेतकऱ्यांच्यावाट्यालाआल्यानाहीतयायोजनाकेवळशोषणाच्यासाधनबनल्यायाचेवास्तवचित्रणग्रामीण कादंबरीतूनआलेआहे. उदा. सरकारी फेडरेशनमधील भ्रष्टाचार

- कादंबरीत प्रामुख्याने शेतकरी वर्गाचे शोषण व्यापारी वर्गाकडून व व्यवस्थेकडून झालेले दिसून येते.
- कापूसकाळ ही कादंबरीशेतीआणिशेतकऱ्यांच्यापरंपरागतवेदनेचेरेखाटनकरतात. त्याचबरोबरग्रामीणजीवनाचेप्राणतत्वअसणारे शेती आणि शेतकरी हेचविषय कादंबरीच्याकेंद्रस्थानी असलेले दिसतात.

**समारोप :**कापूस पिकवणारे शेतकरी, त्यांच्या समस्या, कर्जबाजारीपणा, निसर्गाचा मार आणि बाजारपेठेतील फसवणूक यांसारख्या मुद्द्यांना ही कादंबरी हात घालते. जगू आणि सुशा यांच्या माध्यमातून सहज, प्रभावी आणि सामर्थ्यशाली शैलीत लिहिलेली ही कादंबरी वाचकाला थेट विदर्भातील, मराठवाड्यातील ग्रामीण जीवनात घेऊन जाते.शेतकरी जीवनाचे विदारक वास्तव कापूसकाळ या कादंबरीत कैलास दौंड यांनी मांडले आहे. नैसर्गिक संकटाचा सामना करून शेतकरी शेती करतो पण व्यापाऱ्यांच्या, बाजारपेठेच्या जाळ्यातून शेतकरी सुटू शकत नाही ही वास्तव परिस्थिती आपल्याला दिसते. या कादंबरीच्या माध्यमातून कापूस पिकवणाऱ्या शेतकऱ्यांचा संघर्ष, त्याचबरोबर व्यापारी व बाजारपेठांची वास्तव परिस्थिती अधोरेखित केलेली दिसून येते.

**संदर्भ :**


- संपादक अशोक बेंडखळे – साहित्य कादंबरी विशेषांक २०१६ , इंडिया प्रिंटींग प्रेस वडाळा पृ.६७
- डॉ.एकनाथ आळवेकर – मराठी ग्रामीण कादंबरीची कलारूपे, हर्मिस प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती २०२३ पृ.०८
- उनि पृ. ६७


**साधन ग्रंथ :**


- कापूसकाळ, कैलास दौंड, मॅजेस्टिक पब्लिशिंग हाउस, ठाणे, प्रथमावृत्ती २००९



• **Copyright & License:**

© Authors retain the copyright of this article. This work is published under the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY 4.0), permitting unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.